ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

**बैठक क्रमांक** : 193

**स्थळ** : व्यवस्थापन मंडळ सभागृह

**वार व दिनांक** : मंगळवार दि. 30 एप्रिल 2024

**वेळ** : सकाळी 11.30 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.193 (Online व ऑफलाईन), मंगळवार दि. 30 एप्रिल 2024 सकाळी 11.30 वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू — अध्यक्ष
2. मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्र. कुलगुरू — सदस्य
3. मा.डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे — सदस्य
4. मा. डॉ. जयदिप निकम, नाशिक — सदस्य
5. श्री. नरेंद्र अनंतराव जोशी — सदस्य
6. मा. डॉ. संजय घनश्याम भावे, दापोली - Online सदस्य
7. मा.प्रो. वाल्मिक सरवदे - Online सदस्य
8. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई. प्रतिनीधी – श्री. गर्जे सर - Online सदस्य
9. मा. सचिव, कृषी, मुंबई - Online सदस्य
10. मा.श्री. भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक (कायम निमंत्रित) — सदस्य
11. डॉ. गोविंद कतलाकुटे — निमंत्रित सदस्य
12. श्री. दिलीप भरड, कुलसचिव — सचिव

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

1. मा. डॉ. सत्यकाम, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली — सदस्य
2. मा. डॉ. दिगंबर शिर्के, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
4. मा. संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई — सदस्य
5. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण — सदस्य
6. मा. संचालक, तंत्रशिक्षण,मंबई — सदस्य
7. मा. श्री. उदित शेठ, मुंबई — सदस्य
8. डॉ. संजय चोरडिया, पुणे — सदस्य

| अनु. क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 193.1 | | **स्वागत**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - सभेच्या सुरुवातीला मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव दिलीप भरड यांनी शब्दसुमनांनी प्रत्यक्ष उपस्थित तसेच ऑनलाईन सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तदनंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली. |
| 193.2 | 193.2.1 | **दिनांक 28 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या 192 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे ...**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 28 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या 192 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | 192.2.2 | **विषय - दिनांक 28 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या 192 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल सादर करणे ...**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - 28 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या 192 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली. सदर बैठकीत एप्रिल 2024 पासून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना चांदीचे नाणे देण्याची अंबलबजावणी होत आहे. मा. कुलगुरुंनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांचा कार्यकाळ हा साधारणपणे 3 वर्षांचा असतो. त्यांचा कार्यकाळ संपल्यावर त्यांनी विद्यापीठासाठी दिलेल्या बहुमोल योगदानाप्रित्यर्थ मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांनाही चांदीचे नाणे भेट देऊन त्यांचा सत्कार करावा असा ठराव मांडला. सदर ठरावाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 192.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 193.3.1<br>वित्त विभाग | **विषय - दि. 26 एप्रिल 2024 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** - दिनांक 26 एप्रिल 2024 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार सदर वित्त समिती इतिवृत्त मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — वित्त समितीच्या बैठकीतील विषयांची ठळक वैशिष्ट्ये मांडली. तसेच महत्त्वाच्या 2 विषयांवरचा तपशील वित्त अधिकारी यांनी सभेसमोर मांडला. इतर विषयांवरची सविस्तर चर्चा इतिवृत्तामध्ये दर्शविली आहे.<br>**1.** 2022-23 या वर्षाच्या Income Tax Return साठी आयकर विभागाने रु. 91 कोटी रुपयांचा आयकर मागणी नोंदवून नोटीस दिली होती. सदर आयकराची रक्कम चुकीची असल्याचा दावा विद्यापीठाचे वित्त अधिकारी व त्यांच्या चमूने मुद्देसुद मांडणी करून आयकर विभागाच्या लक्षात आणून दिले. आयकर विभागाने त्यांचेकडून झालेली चूक मान्य करून नव्याने रु. 9 कोटी रुपये आयकर दर्शविला आहे. त्यावरही विद्यापीठाने अभ्यासपूर्ण मांडणी करून आयकर विभागाच्या वरीष्ठ पातळीवर अपील करणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाने डॉ. गोविंद कतलाकुटे वित्त अधिकारी व त्यांच्या चमूचे अभिनंदन केले.<br>**2.** प्रत्येक बँकेचे व्यवहार हे कोड सिस्टीमवर आणून व्यवहार केले जातील. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला Smart Card (Apar no.) देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी येणाऱ्या खर्चासही मान्यता दिली.<br>वरील महत्त्वाच्या विषयांसाठी मा. वित्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच वित्त समितीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 193.3.2<br>आरोग्य विद्याशाखा | **विषय — 2018 पासून विद्यापीठ व गुरूजी हॉस्पिटल यांच्यातील सामंजस्य करारासंदर्भात झालेल्या दि. 24.04.2024 च्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत ...**<br>**टिपणी** — सन 2018 पासून विद्यापीठ व गुरूज हॉस्पिटल यांच्यात झालेल्या करारानुसार विद्यापीठातील नियमीत कर्मचाऱ्यांना श्री गुरुजी हॉस्पिटलकडून वैद्याकीय सेवा देण्यात येत आहे. मात्र ऑगस्ट 2023 पासून श्री गुरूजी रुग्णालय यांचेकडून सामंजस्य करारातील काही बाबी (उदा. पाल्यांचे वय जास्त असणे, आयुर्वेदिक वैद्यकीय सुविधा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया यांसारख्या उपचार सुविधा सामंजस्य करारात नव्हते, तसेच रु. 1,00,000/- पेक्षा जास्त रकमेची वैद्यकीय सुविधा देतांना विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक होते) न तपासता विद्यापीठ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबिय यांना सेवा देण्यात आल्याने त्यांची देयके प्रलंबित होती. त्यासंदर्भात दि. 24.04.2024 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — विद्यापीठातील नियमीत कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुविधेसाठी श्री गुरुजी रुग्णालयाकडून OPD आणि IPD अशा सेवाही पुरविल्या जातात व श्री गुरुजी रुग्णालयाची सेवा सुरळीत सुरु आहे.<br>प्रलंबित देयकांची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. त्यात असणाऱ्या त्रुटींविषयी मागील MoUचा आधार घ्यावा. तसेच वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती मान्य करण्यासाठी शासननियम, निर्णय यांच्या अनुषंगाने देयके तपासणीसाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मेडिकल बोर्ड असावे.<br>श्रीगुरुजी रुग्णालयाशी सद्यस्थितीमधील मुदतवाढ असलेला MoU मध्ये येणाऱ्या अडचणी / संदिग्धता |

| | | |
|---|---|---|
| | | काढण्यासाठी MoU ची कार्यकक्षा वाढविण्यात यावी. आवश्यकता असल्यास नव्याने MoU करण्यात यावा. मागील MoU मध्ये जाणवलेल्या त्रुटींची दुरुस्तीचा विचार नवीन MoU करताना विचारात घ्यावा असे ठरविण्यात आले. |
| | 193.3.3<br>नियोजन कक्ष | **विषय - व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखेची (School of Vocational Education and Skill Development) स्थापना करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये यशस्वी करीअर करण्यासाठी आवश्यक व्यावहारिक कौशल्ये आणि ज्ञान देण्यासाठी तसेच व्यावसायिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा या नवीन विद्याशाखेची निर्मिती करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखेची (School of Vocational Education and Skill Development) निर्मिती होणे आवश्यक आहे. यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर पदे, शैक्षणिक साहित्याचा विचार, खर्चाचे नियोजन करून परिनियम समितीपुढे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा. परिनियम समितीने संमत केलेला प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे सर्वानुमते ठरले आणि सदर विद्याशाखा निर्मितीसाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 193.3.4<br>आस्थापना कक्ष | **विषय - डॉ. अर्चना महादेव पंडागळे, संयोजक (शैक्षणिक), वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांची 3 महिने कराराची मुदतवाढ मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...**<br>**टिपणी** – विद्यापीठ परिनियम क्र. 11(2 of 1993) अन्वये The period of contract shall, at a time, be aof not less than six months and not more than two years, extendiable upto one more year with the prior approval of the Board of Management यानुसार सहा-सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत करारावर विद्यापीठाच्या विविध विद्याशाखा, कक्ष व विभागीय केंद्र येथे नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच पुढील 1 वर्षासाठी मुदतवाढ व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने करता येते. उपरोक्त डॉ. अर्चना महादेव पंडागळे यांचा विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये मा. कुलगुरूंच्या अखत्यारीतील 2 वर्षे नियुक्ती कालावधी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे पुढील मुदतवाढीसाठी मा. कुलगुरुंनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्याशाखेतील डॉ. पंडागळे यांचेकडे सुरु असलेले बी.कॉम. शिक्षणक्रमाच्या प्रथम सत्राच्या पाठ्यपुस्तकांचे लिखाण सुरु आहे. सदर विद्याशाखेची निकड लक्षात घेता डॉ. पंडागळे यांच्या करारावरील मा. कुलगुरू महोदयांनी घेतलेल्या मुदतवाढीच्या निर्णयास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 193.3.5<br>आस्थापना कक्ष | **विषय - विद्यापीठातील गट-अ, गट-ब, गट-क मधील नियमित पदोन्नतीबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळामोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी** – विद्यापीठातील नियमित रिक्त पदांवर गट-अ संवर्गातील उपकुलसचिव, व्हिडीओ एडिटर, व्हिडीओ इंजिनिअर व गट – क संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी, वरिष्ठ सहायक व तंत्रज्ञ अशा प्रशासकीय व तांत्रिक पदांसाठी खातेंतर्गत पदोन्नती समितीची बैठक दिनांक 04.04.2024 रोजी आयोजीत करण्यात आली होती. गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी मान्यतेसाठी सक्षम अधिकारी हे व्यवस्थापन मंडळ असल्यामुळे सदर शिफारशी व्यवस्थापन मंडळ सभेपुढे मान्यतेसाठी सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – कर्मचाऱ्यांची पदोन्नती ही प्रशासकीयदृष्ट्या आवश्यक बाब आहे. रिक्त पदांसाठी घेतलेल्या पदोन्नती समितीच्या शिफारशींना कर्मचाऱ्याचा समाधानकारक गोपनीय अहवाल लक्षात घेऊन पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. पदोन्नतीचे जे पद, ज्या दिवशी रिक्त होईल त्या दिवसापासून पुढील पात्र कर्मचाऱ्यांची पदोन्नती करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली. |
| 193.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – वरील विषयांव्यतिरिक्त असलेल्या ऐनवेळचे विषय मांडण्यासाठी मा. कुलगुरूंनी मान्यता दिली. |

| | | |
|---|---|---|
| 193.4 | 193.4.1<br>वित्त विभाग | **विषय - वित्त समिती सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** - विद्यापीठाच्या अधिनियमातील Statute 1 (IV) च्या तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन मंडळाने विद्यापीठाच्या वित्त समितीमध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. वित्त समितीचे तज्ज्ञ सदस्य असलेले श्री. संजय खडक्कर यांनी ऑगस्ट 2023 मध्ये वित्त समिती सदस्यत्वाचा राजिनामा दिल्यानंतर त्या पदावर व्यवस्थापन मंडळाद्वारे नवीन सदस्यांची नियुक्ती झालेली नाही. तसेच इतरही रिक्त असलेल्या सदस्य पदांवर नामनिर्देशन होणे आवश्यक आहे. नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयार्थ सादर ....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — या विषयावर सविस्तर चर्चा होऊन प्रा. सौ. वाणी निखील लातुरकर यांचे या क्षेत्रातील योगदान आणि सखोल ज्ञान लक्षात घेता त्यांच्या नामनिर्देशनास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच इतर रिक्त नामनिर्देशनाविषयी पुढील कार्यवाही करण्याविषयीचे अधिकार मा. कुलगुरू महोदयांना प्रदान करण्यात आले. |
| | 193.4.2<br>सेवासुविधा कक्ष | **विषय - सुरक्षा रक्षक सेवा यशस्वी अॅकेडमी फॉर स्किल्स यांच्याकडे वर्ग करणेबाबत.....**<br>**टिपणी** - विद्यापीठातील सुरक्षा रक्षक सेवा मे. बॉस सिक्युरिटी अॅण्ड सर्विसेस यांचेमार्फत पुरविली जाते. त्यांची सेवा संपुष्टात आल्यानंतर विद्यापीठ नियमानुसार निविदा प्रक्रिया करून एका ठेकेदाराची निविदा स्विकारण्यात आली होती. परंतु त्याच्याकडून सुरक्षा रक्षकांना किमान वेतन अधिनियमापेक्षा कमी वेतन देण्यात होत होते. यांमुळे सुरक्षा रक्षकांचे शोषण होण्याची शक्यता होती. म्हणून मे. बॉस सिक्युरिटी अॅण्ड सर्विसेस यांची मुदत संपल्यानंतर विद्यापीठास कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविणाऱ्या मे. यशस्वी अॅकेडमी फॉर स्किल्स यांचेकडे सुरक्षा रक्षक ही सेवादेखील वर्ग करण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयार्थ सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — मे. यशस्वी अॅकेडमी फॉर स्किल्स यांचेमार्फत कार्यालयीन कामासाठी कुशल/अकुशल मनुष्यबळ पुरविण्यात येते. मे. बॉस सिक्युरिटी अॅण्ड सर्विसेस यांचा निविदा कालावधी संपलेला आहे. विद्यापीठासाठी सुरक्षा सेवा, कुशल/अकुशल मनुष्यबळ पुरविणारी एकच एजन्सी असावी. तसेच MSSF यांच्याकडे सुरक्षा सेवा पुरविण्याबाबत यापूर्वीच निर्णय झालेला आहे. त्यामुळे मा. डॉ. अनिल कुलकर्णी, मा. सदस्य व्यवस्थापन मंडळ यांच्या समितीचा अहवाल स्विकारण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. तसेच अशी व्यवस्था राबविण्याबाबत/ कार्यान्वित करण्याचा कालावधी, आवश्यकता भासल्यास MoU करण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना प्रदान करण्याचे ठरले. |
| | 193.4.3<br>आस्थापना कक्ष | **विषय — श्री. अमोल गंधे, श्री. अप्पासाहेब फलके, श्री. संदिप थेटे, श्री. कपील शिंदे, श्री. योगेश पाटील व श्री. गणेश पवार या सहा व्यक्तींच्या विद्यापीठात सेवेत सामावून घेणेविषयीच्या वस्तुस्थिती साधर्म्य तपासण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ....**<br>**टिपणी** - विद्यापीठात करारावरील 17 कर्मचाऱ्यांना विहित पद्धतींचा न्यायालयीन निर्णयानुसार सेवेत सामावून घेतले. त्याचाच आधार घेऊन विद्यापीठात करारावर, रोजंदारीवर काम करणाऱ्या वरील 6 कर्मचाऱ्यांनी सेवेत सामावून घेणेबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सदर याचिकेची न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झालेली असून निकाल विद्यापीठाच्या बाजूने लागला. तरीही त्यांनी विद्यापीठाकडे अर्ज केल्यानुसार 17 कर्मचाऱ्यांची सेवेत सामावून घेण्यापूर्वीची वस्तुस्थिती व या 6 जणांची सेवेची वस्तुस्थिती यातील साधर्म्य तपासण्यासाठी 5 सदस्यांची समिती गठीत करण्यात आली. सदर समिती सदस्यांनी याचिकेतील प्रत्येक कर्मचाऱ्याचे विद्यापीठातील प्रवेशापासूनची वस्तुस्थिती पडताळून पाहिली. यांपैकी कोणत्याही कर्मचाऱ्याचे 17 जणांच्या सेवेसारखे साधर्म्य नाही. सबब श्री. अमोल गंधे, श्री. अप्पासाहेब फलके, श्री. संदिप थेटे, श्री. कपील शिंदे, श्री. योगेश पाटील व श्री. गणेश पवार या सहा कर्मचाऱ्यांनी सेवा सातत्यसाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवेदनात केलेली मागणी स्विकारता येणार नाही असा अहवाल समितीने सादर केला. सदर अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — समितीने सादर केलेल्या अहवालास सर्वानुमते स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. तसेच मा. व्यवस्थापन मंडळाचा निर्णय याचिका क्र. 2445 / 2022 च्या निर्णयातील कार्यवाहीच्या अनुषंगाने अनुपालनास्तव विद्यापीठाच्या वकीलांना कळविण्यात यावा असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 193.4.4 आस्थापना कक्ष | **विषय – प्र-कुलगुरू पदाविषयीची परिनियम दुरुस्तीबाबत ...**<br>**टिपणी** – विद्यापीठासाठी कुलगुरू पदाइतकेच प्र-कुलगुरू हे पदही समकक्ष असल्याने विद्यापीठाच्या प्रचलित प्र-कुलगुरुविषयीचा परिनियम दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. कुलगुरु पदाच्या वयाची मर्यादा 65 वर्षांपर्यंत आहे. त्याचप्रमाणे प्र-कुलगुरू पदाच्या वयाचीही मर्यादा 65 वर्षे करावी याबाबत परिनियमात दुरुस्ती करण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – प्र-कुलगुरु पदावरील व्यक्ती तिच्या वयाच्या 65 वर्षापर्यंत कार्यरत राहील अथवा कुलगुरू पदाच्या पदावधीपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यरत राहील अशी प्र-कुलगुरू पदाच्या वयाच्या मर्यादेबाबत परिनियमात दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्यात यावी व सुधारित परिनियम कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. |
| | 193.4.5 कृषी विज्ञान विद्याशाखा | **विषय - प्रा. डॉ. माधुरी सोनवणे, प्र-संचालक कृषि विज्ञान विद्याशाखा यांच्या पूर्णवेळ संचालक पदाच्या कार्यभाराबाबचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...**<br>**टिपणी** – डॉ. माधुरी सोनवणे या प्र.संचालक, कृषि विज्ञान विद्याशाखेचा प्रभारी संचालकांचा कार्यभार मार्च 2022 पासून सांभाळत आहेत. डॉ. माधुरी सोनवणे या सदर कार्यभार स्विकारण्यास तसेच काम करण्यास सक्षम आहेत.<br>विद्यापीठाच्या कायदा 1989 अंतर्गत Section 11 प्रमाणे व विद्यापीठाचे Gazettee मधील Index Part I (A) Second Schedule of the Act मधील Statute No. 3 The Directores नेमणूकीसंदर्भातील तरतुदीनुसार डॉ. माधुरी सोनवणे यांना पूर्णवेळ संचालक म्हणून मान्यता देण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – डॉ. माधुरी सोनवणे यांना संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा हे पदनाम दिनांक 1 मे 2024 पासून निश्चित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | | **मा. कुलगुरु, अध्यक्ष यांच्या मान्यतेने दिलीप भरड, सचिव यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानले व सभा समाप्त झाली.** |

**सचिव तथा कुलसचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष तथा मा. कुलगुरू**
**व्यवस्थापन मंडळ**